महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## जाहिरात क्र. ०६/२०२३ करीताचे शुध्दीपत्रक

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमध्ये सरळसेवा भरती अंतर्गत **"विद्युत सहाय्यक"** पदांकरीता दि. २९/१२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच याबाबत विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यात आलेली होती. ऑनलाईन अर्ज सादर करणेकरीताची वाढीव मुदतवाढ दि. १६/०८/२०२४ अशी होती.

२. उक्त जाहिरातीमध्ये "अनु क्र. ३" खाली कमाल वयोमर्यादा नमूद करण्यात आली आहे. महावितरण कंपनीमध्ये कंत्राटदारांमार्फत कार्यरत / काम केलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगारांना कमाल वयोमर्यादेमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार जाहिरातीमध्ये "अनु क्र. ३" मध्ये खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे:-

**"महावितरण कंपनीमध्ये कंत्राटदारांमार्फत कार्यरत / काम केलेल्या कंत्राटी कामगारांकरीता कमाल वयोमर्यादा सरसकट (Cummulative age) ४३ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील".**

**३. सबब, वरीलप्रमाणे जे उमेदवार वयोधीकामुळे "विद्युत सहाय्यक" या पदाकरीता अर्ज करू शकले नाहीत, त्यांचेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणेकरीताची वेबलिंक (URL Link) कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली असून पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दि. ०७/०१/२०२५ पर्यंत सादर करावेत.** तदनंतर, अर्ज सादर करणेकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४. उक्त पदाची मूळ जाहिरात तसेच त्यानुषंगाने वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शुध्दिपत्रकातील/ प्रसिध्दीपत्रकातील अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

**सही/-**

**दिनांक: ३१/१२/२०२४** **सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं)**